**<u>सं.फौ.ख.क्र.१११९/२०२४</u>**
शासन–वि–परशुराम हिले.
नि.क्र.८ लगत.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ यांची जबानी</u>**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – महेश सदाशिव भोसले,
वय – ४० वर्षे, व्यवसाय – पोलीस हवालदार, ब. क्र. ११५८,
राहणार– दौंड पोलीस स्टेशन, ता. दौंड, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः</u>–**

१. दि. १६.०३.२०२४ रोजी संध्याकाळी ९ ते सकाळी १० पर्यंत ठाणे अंमलदार म्हणून ड्युटी होती. सदर दिवशी ड्युटीवर असताना पोलीस नाईक नामदेव जोशी यांनी त्यांचे चुलत दाजी परशुराम हिले यांना घेऊन आले. ते एसआरपीएफ ग्रुप नं. ७ येथे पीएसआय या पदावर कार्यरत होते. जोशी यांनी सांगितले की, हिले यांच्या सर्वीस रिव्हॉल्वरमधून त्यांच्या घरात फायरींग झालेली आहे. ती गोळी हॉलच्या डाव्या बाजूच्या भिंतीला लागली होती. हिले यांना वरिष्ठांच्या समोर हजर केले आणि त्यांच्या तोंडाला उग्र वास येत असल्याचे व व्यवस्थित चालता येत नसल्याबाबत जोशी यांनी सांगितले. त्यानुसार वरीष्ठांनी हिले यांना सरकारी दवाखान्यात ते मद्यपान केले आहे याबबात चौकशी करण्याकरिता पाठविण्यास सांगितले. तसेच वरीष्ठ घटनास्थळी गेले होते. आता मला दाखविण्यात आलेली दवाखान्यात जाण्याबाबतची यादी तीच आहे. त्यावर सही माझी आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. २२</u>** देण्यात येते. आरोपीचे वैद्यकीय तपासणी करुन डॉक्टरांनी रक्ताचे नमुने घेतले व ते सीलबंद करुन आमच्याकडे पाठविले. जोशीने सदर घटनेबाबत फिर्याद नोंदविली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी व जोशी यांची आहे. त्यावर जोशी यांनी सही माझ्यासमक्ष केली होती. त्यातील मजकूर जोशी यांच्या सांगण्याप्रमाणे लिहून घेतलेला होता जो खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. २३</u>** देण्यात येते. फिर्याद नोंदवून घेतल्यानंतर वरीष्ठांच्या आदेशानुसार त्याचा तपासकाम पीएसआय धुरंदे मॅडम यांच्याकडे सोपविण्यात आला. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. साक्षीदाराने आरोपीला ओळखले आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम. जे. के. शेख यांच्यामार्फत</u> –**

२. मी दौंड पोलीस स्टेशन येथे गेले चार वर्षापासून कार्यरत आहे. नेमकी तारीख सांगू शकत नाही. फिर्यादीने लेखी तक्रार दिली नव्हती. फिर्यादीसोबत तक्रार देण्यासाठी पीएसआय संतोष गारडे आले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत फिर्यादीत नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, जोशी यांनी तक्रार दिली हे मी

खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, रक्ताचे नमुने किती वाजता घेतले हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी गट नं. ७ चे कमांडर कोण होते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी फिर्याद देतेवेळी माझ्यासमोर उपस्थित नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या तोंडाला उग्र वास येत होता व त्याला व्यवस्थित चालता येत नव्हते हे मी खोटे सांगत आहे. त्यावेळी दौंड पोलीस स्टेशन येथे संतोष डोके पीआय म्हणून उपस्थित होते. हे म्हणणे खरे आहे की, डोके साहेबांनी सांगितले म्हणून मी तक्रार घेतली होती. हे मला माहित नाही की, कमांडर यांनी डोके साहेबांना आरोपीविरुध्द तक्रार नोंदविण्यासाठी सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, वरीष्ठांच्या दबावामुळे फिर्याद नोंदवून घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, वरीष्ठांच्या सांगण्यावरुन आरोपीविरुध्द खोटी फिर्याद नोंदवून आज मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः- २४.०९.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.